**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com

## शिक्षण शुल्क समितीच्या दि.११-०४-२०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त

राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शै.वर्ष २०२१-२२ साठीचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीची बैठक दि.११-०४-२०२२ रोजी स.१०:३० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दालनात पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते:-

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | मा. डॉ. धनराज माने- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (ऑनलाईन उपस्थिती) | सदस्य सचिव |
| ३ | डॉ. माधुरी कागलकर (प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई यांच्या प्रतिनिधी) | सदस्य |
| ४ | श्री.व्ही.बी. शर्मा, सनदी लेखापाल | सदस्य |
| ५ | डॉ. नलिनी पाटील - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन, पुणे | सदस्य |
| ६ | डॉ. अंजली ठाकरे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, श्री. शिवाजी कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशन, अमरावती | सदस्य |
| ७ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |

विशेष निमंत्रित म्हणून श्री. दत्तात्रय कहार, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई, श्री. सुनिल सोनवणे, सहा. प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई तथा शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ, श्री. राजेंद्र ढाकणे, सहा. प्राध्यापक, शारिरीक शिक्षणशास्त्र

महाविद्यालय, मुंबई तथा शारिरीक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ व श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल हे उपस्थित होते. तसेच मा. सदस्य तथा मा.सचिव, वित्त विभाग, मंत्रालय/त्यांचे प्रतिनिधी हे बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीच्या सुरूवातीस सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तसेच सदस्य तथा सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना सादर केली व कार्यकक्षेतील महाविद्यालयांचा आढावा सादर केला. एन.सी.टी.ई.च्या संकेतस्थळावरील उपलब्ध यादीनूसार राज्यातील एकूण बी.एड,एम.एड, बी.पी.एड, व एम.पी.एड महाविद्यालयांची संख्या ८१४ असून त्यापैकी २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये ६१३ महाविद्यालये समाविष्ट असल्याचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, (सीईटी सेल) मुंबई यांचेकडून माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यापैकी शिक्षण शुल्क समितीच्या कार्यकक्षेत येणाऱ्या महाविद्यालयांपैकी ३९४ महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क समितीकडे सन २०२१-२२ साठी प्रस्ताव सादर केले आहेत सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.०१:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.०५.०१.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत आढावा.**

:- सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई समितीच्या मागील बैठकीच्या इतिवृत्तातील कार्यपूर्तिबाबतचा अहवाल समितीस सादर केला.

**विषय क्र.०२:- राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शै. वर्ष २०२१-२२ करिताच्या तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या ९२ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

**परिशिष्ट अ** - बैठकीत ठेवलेल्या बी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण ६१ महाविद्यालयांपैकी २० टक्केपर्यंत वाढ असलेल्या ३३, मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या २८ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट ब** - बैठकीत ठेवलेल्या एम.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण १० महाविद्यालयांपैकी २० टक्केपर्यंत वाढ असलेल्या ०४, मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०६ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट क** - बैठकीत ठेवलेल्या बी.पी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण १३ महाविद्यालयांपैकी २० टक्केपर्यंत वाढ असलेल्या ०७, मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०५ महाविद्यालयांच्या .शुल्कास मान्यता देण्यात आली. तसेच ज्यूपिटर शारिरीक शिक्षण

महाविद्यालय, नागपूर यांनी प्रस्तावातील computation form आणि लेखापरिक्षण अहवाल तसेच इतर अभिलेख सादर केलेली नाहीत त्यामुळे सदर महाविद्यालयाचे शुल्क निश्चित करण्यात आलेले नाही.

**परिशिष्ट ड -** बैठकीत ठेवलेल्या एम.पी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण ०६ महाविद्यालयांपैकी २० टक्केपर्यंत वाढ असलेल्या ०४, मागील शुल्कापेक्षा घट होत असलेल्या ०२ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट इ -** बैठकीत ठेवलेल्या एकात्मिक बी.एस्सी.बी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण ०१ महाविद्यालयाच्या २० टक्केपर्यंत वाढ असलेल्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**परिशिष्ट फ -** बैठकीत ठेवलेल्या एकात्मिक विशेष बी.एड. अभ्यासक्रमाच्या एकूण ०१ महाविद्यालयाच्या २० टक्केपर्यंत वाढ असलेल्या शुल्कास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.०३:- सन २०१९-२० ला प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांपैकी ज्या महाविद्यालयांनी शै.वर्ष २०२१-२२ साठी शुल्क निश्चितीकरिता मागील बैठकीत ठेवलेल्या परंतू वेतन खर्चातील वाढ जास्त झाल्यामुळे खुलासे मागविण्यात आले होते त्यावर प्राप्त झालेल्या महाविद्यालयांचा खुलासे समितीसमोर सादर करण्यात आले. अशा एकूण ११ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

बैठकीत ठेवलेल्या बी.एड. अभ्यासक्रमाच्या ०९ व एम.एड. अभ्यासक्रमाच्या ०२ अशा एकूण ११ महाविद्यालयांच्या सन २०१८-१९ च्या तुलनेत सन २०२०-२१ मध्ये वेतन खर्चात भरमसाट वाढ करण्यात आली होती. तथापि वेतन हे बँकेमार्फत दिलेले दिसून येत नाही. वेतन रोख स्वरूपात दिलेले असल्यामुळे खर्च वाढीचा बँक स्टेटमेंटशी ताळमेळ बसत नाही. शुल्क समितीच्या नियमावलीनूसार फक्त बँकेमार्फत झालेले वेतनच शुल्क निश्चितीकरिता विचारात घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात वाढ होत आहे तथापि बँकेमार्फत वेतन न केल्यामुळे अशा महाविद्यालयांना (बी.एड-०६, एम.एड-०१) शुल्क वाढ न देता यापूर्वी समितीने मंजूर केलेले शुल्क कायम करण्यात येत आहे तसेच ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात यापूर्वी समितीने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा घट होत आहे अशा महाविद्यालयांचे (बी.एड-०३, एम.एड-०१) शुल्क मंजूर करण्यात येत आहे.

**परिशिष्ट अ १ बी.एड- ०९ महाविद्यालये**

**परिशिष्ट ब १- एम.एड- ०२ महाविद्यालये**

**विषय क्र.०४:- दि.०५.०१.२०२२ च्या बैठकीत मंजूर करून दिलेल्या शुल्कासंदर्भात काही महाविद्यालयांकडून आक्षेप प्राप्त झाले आहेत, सदर प्राप्त झालेले आक्षेप समितीच्या विचारार्थ सादर. तसेच समितीच्या मागील बैठकीत शुल्क निश्चिती करताना ४ महाविद्यालयांची प्रवेश**

**क्षमता खर्च लेखापाल यांनी अनावधानाने कमी घेतली होती. ती एन.सी.टी.ई. च्या सुधारित आदेशाप्रमाणे दुरूस्त करून सदर महाविद्यालयांच्या शुल्काची फेरनिश्चिती करणेबाबत मान्यतेस्तव सादर.**

:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.०५.०१.२०२२ च्या बैठकीत मंजूर करून दिलेल्या शिक्षण शुल्काबाबत काही महाविद्यालयांनी आक्षेप सादर केले होते. त्या प्राप्त झालेल्या आक्षेपांअन्वये, ३ महाविद्यालयांच्या बाबतीत सुधारित विद्यार्थी संख्या असलेले एन.सी.टी.ई. चे आदेश सादर केल्यामुळे अशा ३ महाविद्यालयांचे शुल्क फेरनिश्चित करण्यात येत आहे.

तसेच ०३ महाविद्यालयांचे सन २०१९-२० च्या प्रस्तावानूसार सन २०२१-२२ चे शुल्क निश्चित करण्यात आले होते. तथापि, आक्षेपामध्ये सदर महाविद्यालयांनी सन २०२०-२१ चे लेखापरिक्षण अहवाल व इतर अभिलेख सादर केल्यामुळे या ०३ महाविद्यालयांचे सन २०२१-२२ चे शुल्क फेरनिश्चीत करण्यात येत आहे.

**परिशिष्ट अ २ बी.एड- ०६ महाविद्यालये**

उपरोक्त **परिशिष्ट अ २** मधील ०६ महाविद्यालयांचे दि.०५-०१-२०२२ च्या बैठकीत यापूर्वी मंजूर झालेल्या इतिवृत्तातील परिशिष्ट-अ मधील प्रस्ताव क्र.०१, १४१ परिशिष्ट-अ १ मधील प्रस्ताव क्र.११२, १३० परिशिष्ट-अ २ मधील प्रस्ताव क्र.०३, २१४ चे शुल्क रद्द समजण्यात यावे.

उपरोक्त प्राप्त झालेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने, सर्वच महाविद्यालयांना एन.सी.टी.ई. ने मंजूर केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेप्रमाणे विद्यार्थी संख्या विचारात घेवून शुल्क निश्चिती करण्यात आली आहे काय, याबाबत खर्च लेखापाल यांच्याकडून पूनर्तपासणी करून घेण्यात आली. त्यानूसार खर्च लेखापाल यांनी दि.१५.०२.२०२२ रोजी सादर केलेल्या पत्रानूसार असे ५ महाविद्यालये आढळली होती कि त्यापैकी ४ महाविद्यालयांना एन.सी.टी.ई. ने मंजूर केलेल्या विद्यार्थी क्षमतेपक्षा कमी विद्यार्थी प्रवेश संख्या विचारात घेवून तर एका महाविद्यालयाला एन.सी.टी.ई. ने मंजूर केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी संख्या विचारात घेवून अनावधानाने किंवा एन.सी.टी.ई.चे सुधारित आदेश नसल्यामुळे शुल्क निश्चिती केली असल्याचे कळविले व त्यांची पूनर्तपासणी करून अहवाल फेरसादर केले. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली व खर्च लेखापाल यांनी गांभिर्याने प्रस्तावाची तपासणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

उपरोक्त एकूण ०४ महाविद्यालयांना एन.सी.टी.ई. चे सुधारित प्रवेश क्षमतेचे पत्र सादर करण्याबाबत संधी देण्यात आली होती व एन.सी.टी.ई. चे सुधारित प्रवेश क्षमतेचे पत्र सादर न केल्यास समितीच्या पुढील बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे कळविले होते. तथापि, यापैकी एकाही महाविद्यालयाने एन.सी.टी.ई. चे सुधारित प्रवेश क्षमतेचे पत्र सादर केले नाही. त्यामुळे प्रस्तावात उपलब्ध असलेल्या एन.सी.टी.ई. आदेशानूसार महाविद्यालयांचे शुल्क

फेरनिश्चित करणेबाबत समितीने निर्णय घेतला. सबब ज्या महाविद्यालयांनी यापूर्वी दि.०५-०१-२०२२ च्या बैठकीत मंजूर केलेल्या शुल्कानूसार विद्यार्थ्यांकडून शुल्क घेतले असल्यास वाढीव शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्यात यावे. एन.सी.टी.ई. चे सुधारित प्रवेश क्षमतेचे पत्र महाविद्यालयांनी सादर केल्यास अशा महाविद्यालयांच्या शुल्काची फेरनिश्चिती करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करून तसे समितीच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

**परिशिष्ट अ ३ बी.एड- ०५ महाविद्यालये**

उपरोक्त **परिशिष्ट अ ३** मधील ०५ महाविद्यालयांचे दि.०५-०१-२०२२ च्या बैठकीत यापूर्वी मंजूर झालेल्या इतिवृत्तातील परिशिष्ट-अ मधील प्रस्ताव क्र.१६९, २२२, १९७, २२५ व २१६ चे शुल्क रद्द समजण्यात यावे.

तसेच काही महाविद्यालयांनी शुल्क वाढीबाबत केवळ सामान्य विनंती केलेली आहे. त्याबाबत कोणतेही अभिलेख जोडलेले नाहीत, अशा महाविद्यालयांच्या विनंत्या समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात आल्या होत्या मात्र कोणतेही सबळ पुरावे/अभिलेख जोडल्याचे दिसून न आल्यामुळे महाविद्यालयांची विनंती मान्य करता येत नाही. अशा विनंतीबाबत महाविद्यालयांच्या प्रस्तावांचे अवलोकन केले असता बहुतांश महाविद्यालयांनी वेतन व वेतनेतर खर्च कमी केला असल्याने किंवा एन.सी.टी.ई.कडून सुधारित प्रवेश क्षमतेचे पत्र सादर न केल्यामुळे शुल्क कमी झालेले आहे, असे दिसून आले. सबब समितीमध्ये याबाबत चर्चा होऊ न शुल्क निश्चिती कशाप्रकारे केली जाते याबाबत सर्व महाविद्यालयांची विभागनिहाय अशी कार्यशाळा शिक्षण शुल्क समितीने घ्यावी, याबाबतचे नियोजन उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या स्तरावरून करण्यात यावे, असे ठरले.

**विषय क्र.०५:-शिक्षण शुल्क समितीच्या दि.०५.०१.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्र.२ व ३ अन्वये महाविद्यालयांना विकास शुल्काबाबत विचारविनिमय करणे.**

:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.०५.०१.२०२२ च्या बैठकीमध्ये महाविद्यालयांना विकास शुल्क मंजूर करण्यापूर्वी समितीची नियमावली व एन.सी.टी.ई. च्या मार्गदर्शक सूचना याचे महाविद्यालय पालन करतात काय, हे तपासण्यासाठी महाविद्यालयाकडून माहिती मागवून समितीच्या पुढील बैठकीत ठेवण्याबाबत निर्णय झाला होता. त्याअनुषंगाने महाविद्यालयांकडून माहिती मागविण्यात आली होती. फक्त ३८ महाविद्यालयांनीच याबाबत माहिती सादर केलेली आहे. त्यापैकी एकाही महाविद्यालयाने एन.सी.टी.ई. च्या नियमानूसार वेतन खाते व विकास शुल्काचे खाते स्वतंत्र ठेवलेले नाही. सदर बाब समितीपुढे सादर करण्यात आली. त्याबाबत विचारविनिमय होवून महाविद्यालयांनी विकास शुल्काचे स्वतंत्र खाते उघडावे व विकास योजना शिक्षण शुल्क समितीकडे सादर कराव्यात. असे विकास शुल्काचे स्वतंत्र खाते क्रमांक व विकास

योजना सादर केल्यानंतर सन २०२२-२३ पासून १० टक्के विकास शुल्क मंजूर करणेबाबत समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

**विषय क्र.०६:- शासकीय अध्यापक महाविद्यालयातील विनाअनुदानित एम.एड अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चितीबाबत.**

:-दि.०४.०३.२०२२ रोजी यासंदर्भात मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडून ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीच्या इतिवृत्तास समितीने मान्यता दिली. त्याअनुषंगाने २०२१-२२ च्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट असणाऱ्या शासकीय अध्यापक महाविद्यालयातील विनाअनुदानित एम.एड (विनाअनुदानित/स्वयंसहाय्यित) अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्यात आले.

**परिशिष्ट ब २ एम.एड- ०३ महाविद्यालये**

**विषय क्र.०७:- अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीबाबत विचारविनीमय करणे.**

:-समितीच्या दि.०५-०१-२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्र.४ अन्वये अल्पसंख्याक संस्थास्तरावर निश्चित करण्यात येणारे शुल्क हे एन.सी.टी.ई. च्या मार्गदर्शक सूचना/आदेशांनूसार होते किंवा नाही याबाबत अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी समिती/अभ्यासगट स्थापन करण्याबाबत शासनास शिफारस करण्यात आली होती. तथापि, शासनाने, अल्पसंख्याक शारिरीक शिक्षण/ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी आकारलेले शुल्क हे राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेच्या आदेशानूसार आहे किंवा कसे, याची तपासणी करण्याचा अधिकार शिक्षण शुल्क समितीस आहे. यास्तव सदर बाबत शासन स्तरावर अभ्यासगट स्थापन करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. तथापि, अशा अभ्यासगटाची स्थापना राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेने प्राधिकृत केलेल्या अधिकाराचा वापर करून शिक्षण शुल्क समितीने त्यांचे स्तरावर करावी. असे कळविले आहे.

याबाबत समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली. शिक्षण शुल्क समितीच्या प्रचलित कार्यपध्दतीनूसार मागील शुल्क निश्चित केल्यानंतर एन.सी.टी.ई. च्या नियमानूसार सदरचे शुल्क ३ वर्ष कायम असते. पुढील शुल्क निश्चिती करतांना शिक्षण शुल्क समिती मागील शुल्काच्या सर्वसाधारणपणे २० टक्के वाढ किंवा खर्चावर आधारीत येणारे शुल्क यापैकी जे कमी असेल ते शुल्क निश्चित करण्यात येते. सन २०१६-१७ मध्ये जेव्हा शिक्षण शुल्क समितीने शुल्क निश्चित करून दिले होते त्यात अल्पसंख्यांक महाविद्यालयांनी सन २०२१-२२ मध्ये मोठया प्रमाणात शुल्क वाढ करून महाडीबीटी या शिष्यवृत्ती पोर्टलवर मान्यतेसाठी पाठविलेले आहे. अल्पसंख्यांक महाविद्यालयातील शुल्क वाढीचा आढावा घेतला असता, १२६ महाविद्यालयांपैकी ४० महाविद्यालयांनी ३० ते २५६ टक्के इतकी शुल्क वाढ केल्याचे दिसून आले. अशा बाबतीत

महाविद्यालयांनी मोठया प्रमाणात शुल्क वाढ केल्यामुळे विद्यार्थ्यांवर तसेच शिष्यवृत्तीच्या माध्यमातून शासनावरही जास्तीचा आर्थिक भार येत आहे. सबब समितीमध्ये खालील मुद्दयांवर चर्चा झाली.

एन.सी.टी.ई. च्या ०९-११-२०१६ च्या पत्रान्वये अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या शुल्क निश्चितीबाबत खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

As such, while the Minority Educational Institutions (MEIs) would be free to fix their own fee structure, the committee would have a jurisdiction over them to ensure that fee charged by MEI is not exhorbitant and there is no profiteering involved therein.

अल्पसंख्यांक महाविद्यालयांना त्यांचे शुल्क निश्चिती करण्याचे जरी अधिकार असले तरी एन.सी.टी.ई. च्या दि.०९.११.२०१६ च्या पत्रान्वये सदरचे शुल्क हे अवाजवी व नफेखोरी करणारे नाहीत, याची खात्री करण्याची बाब ही समितीच्या कार्यकक्षेत येते.

सबब, शासनाच्या शिष्यवृत्तीच्या महाडीबीटी पोर्टलवर अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता देत असताना

१. ज्या महाविद्यालयांनी समितीने निश्चित करून दिलेल्या शुल्कापेक्षा २० टक्केच्या आत वाढ देवून महाडीबीटी पोर्टलवर मान्यतेसाठी सादर केलेले आहे, त्यांच्या शुल्कास मान्यता देण्यात यावी.

२. मागील मंजूर शुल्कापेक्षा २० टक्क्यापेक्षा जास्त शुल्कवाढ करून शिष्यवृत्ती पोर्टलवर शुल्क मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या महाविद्यालयांनी सदरचे शुल्क हे अवाजवी व नफेखोरी करणारे नाही, हे समितीस योग्य त्या अभिलेखांसह सादर केल्यानंतर त्यांचे महाडीबीटी पोर्टलवर शिक्षण शुल्क मंजूर करण्यात यावे. अशा महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर शुल्क निश्चिती करताना जी कागदपत्रे विचारात घेतली आहेत. उदा. लेखा परिक्षण अहवाल, एन.सी.टी.ई. ची मंजूर प्रवेश क्षमता, यापूर्वी मंजूर केलेले शुल्क व computation Form इ. अध्यक्ष व प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने व सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यानंतर पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

**विषय क्र.०८:- शुल्क नियामक प्राधिकरणाप्रमाणे शुल्क निश्चितीचे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात मागविण्यासाठी पोर्टल तयार करणेबाबत सादरीकरण.**

:-शिक्षण शुल्क समितीच्या दि.०५.०१.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्र.१०.५ अन्वये शुल्क नियामक प्राधिकरणाप्रमाणे शुल्क निश्चितीचे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात मागविण्यासाठी पोर्टल तयार करणे व शासनास प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करणेबाबत

निर्णय झाला होता. त्या अनुषंगाने शुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा येथे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात मागविण्याबाबत काम करणारी सेवापुरवठादाराकडून या सॉफ्टवेअरबाबत समितीपुढे प्रत्यक्ष सादरीकरण केले. यावर समितीने अशा पध्दतीचे ऑनलाईन प्रस्ताव मागविणारे पोर्टल तयार करून त्यानूसार ऑनलाईन प्रस्ताव मागविणेसाठी तत्वत: मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.०९:-अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

**९.१ दमयंतीताई देशमुख शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रामटेक नागपूर यांच्या सन २०२१-२२ च्या शुल्क निश्चितीबाबत.**

:-याबाबत सदर महाविद्यालयाचे शुल्क हे एन.सी.टी.ई. ने मंजूर केलेल्या १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेनूसार निश्चित केले होते तथापि शुल्क निश्चित केल्यानंतर एन.सी.टी.ई. ने ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता दिलेली होती. त्यानूसार सन २०२१-२२ करिता ५० विद्यार्थी संख्या गृहित धरून शुल्क फेरनिश्चिती करण्यास समितीने मान्यता दिली आहे. सदर फेरनिश्चित झालेले शुल्क हे सन २०२१-२२ या वर्षापासूनच लागू होईल.

**परिशिष्ट अ ४ बी.एड- ०१**

**९.२ ज्या महाविद्यालयांचे शुल्क खुप कमी झाले आहे, अशा महाविद्यालयांच्या बाबतीत विचारविनिमय करणे:-**

सन २०२१-२२ निश्चित केलेल्या ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात खुप घट झालेली आहे. अशा महाविद्यालयांच्या बाबतीत समितीमध्ये चर्चा झाली. शुल्कामध्ये घट होण्याची सर्वसाधारणपणे दोन कारणे दिसून आले.

१. महाविद्यालयाने वेतन व वेतनेतर खर्च नियामानूसार न केल्यामुळे
२. एन.सी.टी.ई. ने मंजूर केलेली विद्यार्थी प्रवेश क्षमता ही एन.सी.टी.ई. च्या मान्यतेशिवाय परस्पर कमी केल्यामुळे

उपरोक्त दोन्ही कारणांचा प्रस्ताव तपासत असतांना विचार करून महाविद्यालयांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली होती व एन.सी.टी.ई.चे मंजूरी विद्यार्थी संख्येचे सुधारित आदेश सादर करण्यास कळविले होते, तथापि महाविद्यालयांनी असे आदेश सादर केलेले नाहीत. तसेच वेतनावरील खर्च कमी असण्याची कारणे ही पुरेशा प्रमाणात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या न करणे, अशा कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन न देणे ही आहेत.

अशा प्रकारे पुरेसे कर्मचारी नसल्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यामध्ये अडचणी येवू शकतात. याबाबत समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली. शिक्षण शुल्क हे खर्चावर आधारित निश्चित होत असल्यामुळे ज्याप्रमाणात महाविद्यालयांनी खर्च केलेला आहे. त्याप्रमाणातच विद्यार्थ्यांचे शुल्क निश्चित होणे ही बाब क्रमप्राप्त आहे. त्यामुळे

महाविद्यालयांना शुल्क निश्चितीची नियमावली पुन:श्च एकदा कळवून त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करण्यात यावी, असे ठरले.

**९.३ ज्या महाविद्यालयांचे सन २०२१-२२ चे शुल्क निश्चित झालेले आहे. परंतू ज्या महाविद्यालयांना एन.सी.टी.ई. चे सुधारीत आदेश/पत्र सादर करणेबाबत कळविले होते, अशा महाविद्यालयांना एन.सी.टी.ई. चे पत्र सादर करण्यासाठी एक मुदत देणेबाबत महाविद्यालयांनी विनंती केली आहे.त्याबाबत विचारविनिमय करणे. जेणेकरून ठराविक मुदतीत प्राप्त झालेल्या सुधारित आदेशांनूसार शुल्कात सुधारणा करणे सोईस्कर होईल.**

:- अशा महाविद्यालयांपैकी ज्या महाविद्यालयांना शुल्क फेरनिश्चित करावयाचे असल्यास अशा महाविद्यालयांनी तात्काळ एन.सी.टी.ई. चे सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे आदेश सादर करावेत, त्यानुसार त्यांचे शुल्क फेरनिश्चित करून समितीच्या पुढील बैठकीत मान्यतेस्तव ठेवण्यात यावेत.

**९.४ सोमय्या विद्याविहार यांचे के.जे. सोमय्या कंप्रेहेन्सिव्ह कॉलेज ऑफ एज्यूकेशन अॅन्ड रिसर्च, विद्याविहार, मुंबई या महाविद्यालयाचे सन २०१९-२० मधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसंदर्भात महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी मिळणे बाबत.**

शिक्षण शुल्क समितीच्या दि.०९-०१-२०२० च्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्र.३.३ नूसार, ज्या महाविद्यालयांना खाजगी विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला आहे, अशा खाजगी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती मंजूर करू नये, असा निर्णय झालेला आहे.

प्राचार्य, सोमय्या विद्याविहार यांचे के.जे. सोमय्या कंप्रेहेन्सिव्ह कॉलेज ऑफ एज्यूकेशन अॅन्ड रिसर्च, विद्याविहार, मुंबई या महाविद्यालयाचे पत्र क्र.२०२२/६३ दि.१९.०३.२०२२, नूसार सोमैय्या शैक्षणिक संकुलास शासनाने खाजगी विद्यापीठाचा दर्जा दि.२६.०८.२०१९ पासून दिलेला आहे. परंतू सन २०१९-२० या शै.वर्षामध्ये सदर महाविद्यालय मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गतच होते व सदर वर्षातील ५५ विदयार्थ्यांचे प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेअंतर्गतच करण्यात आलेले आहेत. तसेच या विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठातील पात्रता यादी व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्रवेशित प्रक्रिया मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे सन २०१९-२० मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे प्रथम व व्दितीय वर्षाचे शुल्क महाडीबीटी पोर्टलवर शुल्कामध्ये वाढ न करता मंजूर करून दयावे, असा निर्णय झाला.

**९.५ डॉ.माणिकराव गुरसळ समितीने सूचविलेल्या शिफारशींनूसार दि.१०.०७.२०१९ च्या बैठकीच्या इतिवृत्तानूसार महाविद्यालयांकडून प्रस्ताव सादर करताना महाविद्यालयाच्या झालेल्या खर्चावर ०.५ % रक्कम प्रक्रिया शुल्क म्हणून गोळा करणेबाबत तसेच त्यातून इतिवृत्तात दर्शविल्याप्रमाणे समितीचा खर्च** भागविण्यात **यावा, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.**

:- सदर बाबत सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी पाठपुरावा करावा.

९.६. एन.सी.टी.ई. च्या बैठकीसाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रतिनिधींना उपस्थित राहण्यासाठी उच्च

शिक्षण संचालनालय, पुणे यांचे स्तरावरून एन.सी.टी.ई. शी पत्रव्यवहार करण्यात यावा.

९.७ संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेस्तरावरून ना-हरकत प्रमाणपत्र देत असताना एन.सी.टी.ई.च्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात असल्याची दक्षता घेण्यात यावी.

९.८ संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे Academic Audit करणेबाबतची कार्यवाही करावी.

९.९ जी महाविद्यालये सन २०२१-२२ च्या केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट आहेत, परंतू अशा महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क समितीकडे सन २०२१-२२ करिता शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर केलेले नाहीत, अशा महाविद्यालयांची माहिती उचित कार्यवाहीसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणास कळविण्यात यावी. तसेच अशा महाविद्यालयांचे महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती शुल्क मंजूर करण्यात येणार नाही व त्याबाबतची सर्व जबाबदारी ही महाविद्यालयांची असेल, असे महाविद्यालयास कळविण्यात यावे, असा निर्णय झाला.

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत आक्षेप असल्यास सबळ अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे सादर करावेत. समितीच्या पुढील बैठकीत सदर आक्षेप सादर करण्यात येतील.

मा.अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई